# प्रसिध्दी पत्रक

**श्री. अविनाश नानासाहेब जाधव वय ४५, व्यवसाय चालक तहसिल कार्यालय, औरंगाबाद यांनी रुपये १,५०,०००/- ची लाच मागुन स्विकारण्याचे मान्य केले म्हणुन गुन्हा नोंद**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | आरोपीचे नाव | :- | श्री. अविनाश नानासाहेब जाधव, वय ४५ वर्षे व्यवसाय - नौकरी, चालक, तहसिल कार्यालय जि. औरंगाबाद. |
| २. | गुन्हा घडला तारीख वेळ | :- | दिनांक ०१/११/२०१८ रोजी १२.०० ते २१.०० चे सुमारास. |
| ३. | गुन्हा दाखल तारीख व वेळ | :- | दिनांक १९/११/२०१८ रोजी १४.५४ वाजता. |
| ४. | गुन्हयाचे ठिकाण | :- | तहसिल कार्यालय, औरंगाबाद. |
| ५. | लाचेची मागणी रक्कम | :- | १,५०,०००/- रुपये |
| ६. | लाचेचे कारण | :- | रेतीच्या गाड्या औरंगाबाद परीसरात चालविण्यासाठी मासिक हफ्ता म्हणुन लाचेची मागणी. |

यातील तक्रारदार हे रेती व्यवसायीक असुन ते औरंगाबाद परीसरात रेती वाहतुक करण्याचा व्यवसाय करतात.

दिनांक १९/०९/२०१८ रोजी मी रेती वाहून नेत असताना महसुन खात्याने तक्रारादर यांचेकडे रॉयल्टी असताना सुध्दा केस केली व मला १ लाख रुपये दंड केला. सदर केस झाल्यावर तहसिलदार यांचे शासकिय गाडीवरील चालक श्री. जाधव यांचे सोबत त्यांची ओळख झाली. श्री. जाधव यांनी तक्रारदार यांना सांगितले होते की, तुला जर तुझा ट्रक रेती वाहन्यासाठी लावायचा असेल तर तु आम्हाला हफ्ता चालू कर, आम्ही तुझ्यावर केस करणार नाही, तु जर आम्हाला पैसे न देता ट्रक चालविलास तर तहसिलदार साहेब तुझ्या ट्रक वर केस करतील. अशा आशयाची सविस्तर तक्रार दिली.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०१/११/२०१८ रोजी तहसिलदार यांचे गाडीवरील चालक श्री. अविनाश जाधव यांच्याकडे पंच साक्षीदारांसमक्ष लाचेची मागणी बाबत पडताळणी केली असता श्री. अविनाश जाधव यांनी तक्रारदार यांना त्यांच्या ट्रकचे व त्यांचे ओळखीचे दत्ता खरात व सचिन सोळुंके उर्फ अंकल यांच्या गाड्यांचे सुध्दा पैशे तू जमा कर व तिन्ही गाड्याचे दिड लाख रुपये घेवून ये असे सांगीतले अशा रीतीने आलोसे श्री. जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे रेती वातुकीसाठी त्यांचे व त्यांच्या दोन्ही मित्रांचे असे दिड लाख रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले त्यावरुन पोलीस स्टेशन सिटीचौक येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तक्रारदार यांच्या प्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारसंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे याव असे अवहान मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.**

पोलीस उप अधिक्षक कार्यालय अँन्टी करप्शन ब्युरो औरंगाबाद

फोन क्र. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि नं. १०६४.

Mail ID - १) dyspacbaurangabad@mahapolice.gov.in २) dyspacbabad@gmail.com